जिल्हा परिषद मुख्यालयांतर्गत बदल्या व नेमणुक करणे बाबत..
संवर्गः- कनिष्ठ प्रशासन अधिकारी

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-१/आस्था-३/२२०२८२७/८९/२०२५
अहिल्यानगर दिनांक २८/०८/२०२५

वाचा :- १. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलंसधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.जिपब-४१४/ प्र.क्र-११२/आस्था-१४ दिनांक १५/०५/२०१४.
२. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील नियम ९५

संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयातील दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार प्रकरण-५ मधील १ (ब) (२) मधील तरतुदींनुसार जिल्हा परिषदेंतर्गत एका विभागातुन दुस-या विभागात बदली करण्याची तरतुद असल्याने कनिष्ठ प्रशासन अधिकारी गट-क या संवर्गातील कर्मचा-यांचे त्यांच्या नावापुढील रकाना क्रमांक ३ येथून रकाना क्रमांक ४ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने बदली करणेत येत आहे.

| अ.नं. | कर्मचा-याचे नांव | सध्याचे कार्यरत ठिकाण | स्थानांतरणाने द्यावयाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री औटी विजय सदाशिव | ग्रामपंचायत विभाग,<br>जिल्हा परिषद अहिल्यानगर | शिक्षण विभाग (प्राथमिक)<br>जिल्हा परिषद अहिल्यानगर |

वरील कर्मचा-यांना बदलीच्या ठिकाणी हजर होणेकामी आदेशाच्या दिनांकापासुन कार्यालयीन वेळेनंतर या स्तरावरुन एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. संदर्भ क्र. १ मधील प्रकरण-१ मुद्दा क्र. १७ नुसार बदली होण्यापुर्वी ज्या ठिकाणी कर्मचारी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन आदेशाच्या दिनांकानंतर वेतन व भत्ते अदा करु नयेत.

तसेच सदरची बदली ही संपुर्ण प्रशासकीय बाब असल्याने संबंधित कर्मचा-याने राजकीय दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ६(५) चा भंग केला म्हणून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. वरीलप्रमाणे स्थानांतरण केलेल्या कर्मचा-यांना पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय असणार नाही.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२५०८२८०६०१५१ असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 28-08-2025 19:35:00
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री औटी विजय सदाशिव, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर
द्वारा व प्रत :- उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं), जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत :- माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव रवाना
१. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद अहिल्यानगर
२. शिक्षणाधिकारी (प्राथ), जिल्हा परिषद अहिल्यानगर
३. निवड नस्ती/ कार्यासन आस्था-२, साप्रवि, जि.प.अहिल्यानगर